# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## सार्वजनिक उत्सवाच्या वेळी रस्त्यावर व पदपथावर तात्पुरता मंडप / स्टेज उभारल्यानंतर वाहतुक सुरळीत राहील व नागरिकांना येण्याजाण्यासाठी अडथळा निर्माण होऊ न देणे, तसेच ध्वनी प्रदुषणा बाबत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रभाविरित्या सुविधा उपलब्ध करून देणे

## मार्गदर्शक तत्वे - 2026

**मा.उच्च न्यायालय यांचेकडील जनहित याचिका क्र.173/2010 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार**

<u>**अनुक्रमणिका**</u>


| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 1. | प्रस्तावना |
| 2. | अर्ज सादर करणे |
| 3. | अर्ज प्राप्त झाल्यानंतर परवानगी देण्याची कार्यप्रणाली |
| 4. | मंडप व कमान परवानगी करीता सर्वसाधारण निकष |
| 5. | ध्वनी प्रदुषाचे निकष |
| 6. | शुल्क आकारणी |
| 7. | तक्रार निवारण |
| 8. | सर्वसाधारण अटी / शर्ती |
| 9. | शास्ती |
| 10. | जाहिर आवाहन (परिशिष्ट क) |
| 11. | विविध उत्सवांकरीता मंडप परवानगी अर्जाचा नमुना (परिशिष्ट ख) |
| 12. | परवानगी पत्राचा नमुना (परिशिष्ट ग) |

# प्रस्तावना

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक सार्वजनिक उत्सव साजरे केले जातात.सदर उत्सवाच्या अगोदर अर्जदार मंडप / स्टेज उभारण्यासाठी महानगरपालिकेच्या वॉर्ड कार्यालयात अर्ज करीत असतात. तात्पुरत्या मंडप / स्टेज उभारण्याच्या परवानगीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम 234 अन्वये पोलीस आयुक्त यांच्या संमतीने उभारणेसाठी महानगरपालिका आयुक्तांना परवानगी देण्याचे ऐच्छिक अधिकार आहेत.

सार्वजनिक उत्सवाच्या वेळी अनेक अर्जदारांना मंडप / स्टेज उभारण्यासाठी परवानगी प्राप्त करून घेण्यासाठी त्रास होतो. मंडप उभारणी केल्यानंतर नागरिकांना ये - जा करणे करीता, तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. उत्सव साजरे करतांना ध्वनी प्रदुषणामुळे पर्यवरणाचा -हास होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो व त्यामुळे नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होतात. त्यामुळे उत्सव साजरा करणे करीता मार्गदर्शक तत्वे तयार करण्याची गरज भासली आहे.

सदर बाब विचारात घेऊन अर्जदारांना मंडप उभारण्याची परवानगी वेळेवर मिळावी व त्यांना कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये, तसेच उत्सव साजरा करते वेळी परिसरातील नागरिकांना व वाहतुकीला अडथळा होऊ नये, या बाबींचा सखोल विचार करून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने कार्यालयीन पध्दती व मार्गदर्शक तत्वे - 2026 तयार केलेली आहेत.

डॉ.महेश बेडेकर विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र.173/2010 ही याचिका प्रमुख्याने सर्वसामान्य जनतेशी निगडीत असलेल्या खालील दोन मुद्दांबाबत दाखल करण्यात आली होती.

1. परवानगी देऊन तात्पुरता मंडप अशा रितीने उभारण्यात येऊ नये, जेणे करून रस्त्यावरील वाहतुक कोंडी निर्माण होते किंवा नागरिकांना रस्ते / पदपथावरून चालताना अडथळा निर्माण होतो.
2. ध्वनी प्रदुषन नियम 2000 मधील कलम 7 नुसार महानगरपालिका क्षेत्रात ध्वनी प्रदुषन नियमाचे उल्लंघन होते.

उपरोक्त मुद्दांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालयाने दिनांक 10, 11, 12 व 16 ऑगस्ट 2016 रोजीच्या आदेशात निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशांची योग्य रितीने अंमलबजावणी व्हावी व अर्जदारांना तात्पुरता मंडप उभारणीसाठी परवानगी मिळण्याची कार्यपध्दती सहज सुलभ व्हावी आणि महापालिका क्षेत्रात साजरे करण्यात येणारे उत्सव व सोहळे नागरिकांनी आनंदात साजरे करावेत ही बाब लक्षात घेऊन महानगरपालिकेने जनहितार्थ मार्गदर्शक तत्वे तयार केलेली आहेत. यामध्ये नागरिकांना / मंडळांना परवानगी लवकरात लवकर मिळावी या दृष्टीकोनातुन मंडपांना परवानगी देणे बाबतचे अधिकार सहाय्यक आयुक्त, वॉर्ड कार्यालय यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

सदर मार्गदर्शक तत्वांमुळे सार्वजनिक उत्सव शांततेत व सुरळीत रितीने, तसेच जनजीवनावर कोणताही दुष्परिणाम न होता सुनियोजित पध्दतीने साजरे करण्यास निश्चित मदत होईल, असा माझा विश्वास आहे.

Digitally signed by
Amol Jagannath Yedage
Date: 30-08-2026
20:39:27

**अमोल येडगे** (भाप्रसे)
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

Digitally signed by
NAWALE VIKAS RAMESH
Date: 27-08-2026
11:09:12

## ➢ अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती.

1. मोठया उत्सवामध्ये (उदा. गणेशोत्सव व नवरात्रौत्सव) उत्सवाच्या दिनांकाच्या आधी अर्ज स्विकारण्याच्या तारखेला कालावधी जाहिर सुचना परिशिष्ठ ‘क’ नुसार महानगरपालिका स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करेल.
2. सार्वजनिक उत्सव प्रसंगी तात्पुरत्या मंडप उभारण्यासाठी परवानगी अर्जाचा नमुना परिशिष्ट ‘ख’ या विहीत नमुन्यात अर्जदाराने अर्ज करावयाचा आहे.
3. www.chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर (Website) Online दाखल करता येईल.

## ➢ अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

1. मंडप / स्टेज ज्या ठिकाणी उभारण्यात येणार आहे, त्या जागेच्या मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र.
2. मंडप / स्टेजचा स्थळ दर्शक नकाशा.
3. धर्मादाय आयुक्त यांचेकडील प्रमाणपत्र. (सार्वजनिक मंडळाच्या बाबतीत)
4. स्थानिक पोलीस स्टेशन यांच्याकडील मागील वर्षाचा ना हरकत दाखला. (असल्यास)
5. वाहतुक पोलीस यांच्याकडील मागील वर्षाचा ना हरकत दाखला. (असल्यास)
6. अग्निशमन विभाग यांच्याकडील मागील वर्षाचा ना हरकत दाखला. (असल्यास)
7. एम.एस.ई.बी. कडील ना हरकत दाखला. (असल्यास)
8. मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांची नावाची यादी व संपर्क क्रमांक

## ➢ अर्ज प्राप्त झाल्यानंतर परवानगी देण्याची कार्यप्रणाली.

1. सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करतील.
2. नाकारण्यात आलेल्या अर्जांची कारणे अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकानंतर 02 दिवसात Online पत्राव्दारे अर्जदारास कळविण्यात येतील.
3. पात्र अर्ज खालील विभागाच्या ना हरकत दाखल्यासाठी संबंधीत विभागास पाठविण्यात येतील. सदर विभागांनी अर्ज मिळाल्यापासून 03 दिवसांच्या आत ना हरकत दाखला दयावयाचा आहे. देण्यात येणारा ना हरकत दाखला किंवा अर्ज नाकारण्याची कारणेही Upload करावयाची आहेत.

   अ) स्थानिक पोलीस स्टेशन, ब) वाहतुक पोलीस, क) अग्निशमन विभाग
4. उपरोक्त ना हरकत दाखले प्राप्त झालेल्या दिनांकापासून मंडळाने स्थळदर्शक नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधीत उप अभियंता (स्थापत्य) यांनी 03 दिवसापर्यंत जागेची पाहणी करून त्यानुसार पाहणी अहवाल तयार करावयाचा आहे.
5. उप अभियंता (स्थापत्य) यांचेमार्फत रस्त्यावर व पदपथावर उभारण्यात येणारे तात्पुरत्या स्वरूपातील मंडप उभारल्यानंतर वाहतुक सुरळीत राहील व नागरिकांना येण्याजाण्यासाठी अडथळा निर्माण होणार नाही, या बाबत

पाहणी अहवालात अभिप्राय नोंदवून व पहाणी केल्यावर ज्या ठिकाणी मंडप उभारण्यात येणार आहे, त्या जागेचे रेखांकन करून निशाणी दर्शविणारा Latlong GPRS फोटो काढुन Online वर Upload करावयाचा आहे.

6. मुद्दा क्र.01 ते 05 बाबतची पुर्तता झाल्यानंतर संबंधीत विभागाने सहा.आयुक्त तथा झोन कार्यालय यांनी 03 दिवसात परवानगी पत्र तयार करून Online / Offline वर Upload करतील / कळवतील.

## ➢ सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात येणा-या मंडपाच्या परवानगी करीता सर्वसाधारण निकष

1. मंडप / स्टेज उभारण्यासाठी वाळुच्या ड्रममध्ये लाकडी बांबु टाकुन मंडप उभारता येईल.
2. मंडप / स्टेज उभारतांना रस्त्याचे खोदकाम करता येणार नाही. केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

## ➢ तात्पुरत्या स्वरूपात कमान उभारावयाचे निकष

1. प्रत्येक मंडळास मंडपाच्या आवारात 02 कमानी उभारण्याची परवानगी देण्यात येईल.
2. कमान उभारल्यामुळे वाहतुकीस व नागरिकांना येण्याजाण्यासाठी अडथळा निर्माण होईल. अशा रितीने कमान उभारता येणार नाही.
3. कमानीची उंची ही जास्तीत जास्त 22 फुटापर्यंत असावी.
4. कमान टाकण्याची परवानगी ही रस्ता खोदण्याची परवानगी असणार नाही.
5. कमान उभारण्यासाठी वाळुचे ड्रममध्ये लाकडी बांबु टाकुन कमान उभारता येईल.
6. ज्यांना ड्रममध्ये लाकडी बांबु टाकुन कमान उभारणे शक्यच नसेल व रस्ता खोदणे आवश्यक असेल. त्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 240 अन्वये विहीत शुल्क भरून सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचेकडून स्वतंत्र परवानगी घ्यावी व कमान हटविल्यानंतर रस्ता पुर्ववत करावा. अन्यथा यासाठी भरण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
7. कमानीवरती व मंडपाच्या आवारात तात्पुरत्या स्वरूपात व्यावसायीक जाहिरात करावयाची असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 245 अन्वये विहीत शुल्क भरून सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांचेकडून वेगळी परवानगी घ्यावी.

## ➢ ध्वनी प्रदुषणाचे निकष.

1. लाऊड स्पिकरसाठी स्थानिक पोलीस विभागाकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक राहील.
2. लाऊड स्पिकरची ध्वनी मर्यादा खालील प्रमाणे असेल.

| अ.क्र. | क्षेत्र | Limit of dB (A) Leq | |
|---|---|---|---|
| | | दिवस मर्यादा सकाळी 6 ते रात्री 10 वाजेपर्यंत | रात्र मर्यादा रात्री 10 ते सकाळी 5 वाजेपर्यंत |
| 1. | औद्योगिक क्षेत्र | 75 | 70 |
| 2. | वाणिज्य क्षेत्र | 65 | 55 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | रहिवाशी क्षेत्र | 55 | 45 |
| 4. | सायलन्स झोन | 50 | 40 |

3. रूग्णालय, शैक्षणिक संस्था, न्यायालय, धार्मिक स्थळे यांचे 100 मीटर आवार हा सायलन्स झोन असेल.

## ➢ तक्रार निवारण तथा अर्जा करीता करावयाचे संपर्क ठिकाण.

1. नागरिकांना विना परवानगी मंडप व ध्वनी प्रदुषणाची तक्रार करणेसाठी खालील टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदविता येईल. महानगरपालिकेव्दारे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणेसाठीचे अर्ज प्रत्यक्ष वॉर्ड कार्यालयात दयावेत अथवा महानगरपालिकेने सुरू केलेली एक खिडकी योजने अंतर्गत मुख्य महानगरपालिका कार्यालय, टाऊन हॉल येथे कार्यालयीन वेळेत दयावेत. तसेच संबंधीत वॉर्ड कार्यालयाच्या नमुद केलेल्या ई-मेल आय.डी.वर अर्ज पाठविण्याची सुविधा उपलब्ध आहे.

| अ. क्र. | वॉर्ड अधिकारी तथा सहाय्यक नोडल अधिकारी | टोल फ्री क्रमांक | ई-मेल आय.डी. |
|---|---|---|---|
| 1. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amc.warda@gmail.com |
| 2. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardg525@gmail.com |
| 3. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardc3789@gmail.com |
| 4. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amcwar0@gmail.com |
| 5. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardezone05b@gmail.com |
| 6. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardezone06b@gmail.com |
| 7. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amcwardaf@gmail.com |
| 8. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amcsatara8i@gmail.com |
| 9. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amcward09@gmail.com |
| 10. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardoffice10csmc@gmail.com |

2. ध्वनीप्रदुषण करीता प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंद घेण्यात येईल व सदरची तक्रार स्थानिक पोलीस स्टेशन यांना कळविण्यात येईल. स्थानिक पोलीस स्टेशन मार्फत ध्वनी प्रदुषन नियम 2000 नुसार उचित कारवाई करण्यात येईल.
3. विनापरवानगी उभारण्यात आलेल्या मंडपाची तक्रार प्राप्त होताच कार्यालयातील अतिक्रमण विभागामार्फत अनाधिकृत मंडप हटविण्यात येईल.

## ➢ सर्वसाधारण अटी

1. परवानगी अर्ज दाखल केला याचा अर्थ परवानगी मिळाली असे होत नसून, मंडळाने लेखी परवानगी मिळाल्यानंतरच मंडप / स्टेज उभारणीचे काम सुरू करावे.
2. सार्वजनिक मंडळास / संस्थेस प्रस्तावित मंडप / स्टेजची रुंदी रस्त्याच्या 1/4 पेक्षा अधिक असणार नाही, या मर्यादेच्या आतील आकारमानाचे मंडप / स्टेज उभारण्यास परवानगी देण्यात यावी. (सार्वजनिक वाहतुकीस अडथळा येणार नाही व नागरिकांना त्यापासून उपद्रव तसेच आक्षेपार्ह होणार नाही, याची दक्षता संबंधीत मंडळांनी घ्यावयाची आहे.)

3. ज्या प्रस्तावित मंडप / स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप / स्टेज इ. उभारणे करीता किमान 12 फुट रुंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅक करीता उपलब्ध राहील, याची दक्षता घ्यावी.

4. कोणत्याही ठिकाणी 8 फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप / स्टेज इ. उभारणी करीता परवानगी महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही. मंडप / स्टेज इ. अंतर विद्युत तार व डी.पी. बॉक्स पेक्षा 06 फुट अंतरावर ठेवणे संबंधीत मंडळावर बंधनकारक करण्याच्या अटीवर मंडप उभारणीस परवानगी देणेत यावे.

5. संबंधीत मंडळास मंडप / स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणाचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरीता परवानगी देण्यात येऊ नये, अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळुचे भरलेल्या ड्रमवर मंडप / स्टेज याकरीता आवश्यक असणारे बांबु रोवुन त्यापासून अथवा पुर्वनियोजित व्यवस्थापना प्रमाणे मंडप / स्टेज या करीता बांबु रोवण्यात यावेत. रस्ते / सार्वजनिक खोदाई करुन मंडप / स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत मंडळावर रस्ते अनाधिकृतपणे खोदाई बाबत कायदेशीर कारवाई करण्यात येऊ नये.

6. सार्वजनिक उत्सवांकरीता आवश्यक विद्युत जोडणी महानगरपालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोलमधुन घेता येणार नाही, असे आढळुन आल्यास संबंधीत मंडळावर दंडात्मक कारवाई करुन त्यांची परवानगी रद्द करण्यात यावी.

7. संबंधीत मंडळाला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्त 15 मीटर अंतरापर्यंत विद्युत रोषणाई करता येईल. झाडांवर व विद्युत पोलवर विद्युत रोषणाई करण्यास मनाई आहे. झाडांवर व विद्युत पोलवर रोषणाई केली असल्याचे आढळुन आल्यास संबंधीत प्रभागाचे सहा.आयुक्त यांनी ती संबंधीत मंडळांकडून तात्काळ काढुन टाकण्याची कारवाई करावी.

8. परवानगी मिळाल्यानंतर परवानगीचे पत्र मंडपाच्या दर्शनी भागावर किमान दोन ठिकाणी प्रदर्शित करावे.

9. मंडप / स्टेजच्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाकडून नियमानुसार विद्युत जोडणी घेण्यात यावी. विद्युत पुरवठा घेते वेळी वायरिंगमध्ये जोड खुला राहणार नाही. या करीता सर्व विद्युत कामे परवानाधारक ठेकेदारमार्फत योग्य प्रकारे करावीत.

10. मंडप / स्टेजच्या ठिकाणी आग प्रतिबंधक साधने, प्रथमोपचाराची साधने (First Aid Box) तात्काळ उपलब्ध होतील. अशा प्रकारे मंडपा लगत ठेवावीत.

11. कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रत्येकी 200 लीटर क्षमतेच्या पाण्याच्या 02 टाक्या भरून ठेवणे गरजेचे आहे.

12. मंडपातील आरास बंद स्वरूपाची असल्यास नागरिकांना अत्यावश्यक वेळी बाहेर जाण्यासाठी सुटसुटीत मोकळा मार्ग ठेवण्यात यावा.

13. मंडप / स्टेज उभारतांना अग्निशमनदलाची वाहने अत्यावश्यक घटनेच्या वेळी मंडपाजवळ जाऊ शकतील अशा प्रकारे मोकळी जागा ठेवण्यात यावी.
14. मंडपातुन / स्टेज मधुन निघालेला सर्व कचरा ओला व सुका असा वर्गीकरण करून, तसेच निर्माल्य बंद डब्यात ठेऊन त्याची विल्हेवाट लावण्याची आणि उत्सव मंडप व आजुबाजुला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मंडळाची राहील.
15. मंडप / स्टेज पासून विद्युत तार व डी.पी. बॉक्स 05 फुट अंतरावर ठेवणे मंडळावर बंधनकारक आहे. तसेच विद्युत रोषणाई मंडळापासून जास्तीत जास्त 15 मीटर अंतरापर्यंत करता येईल.
16. मंडप / स्टेजच्या प्रवेशव्दारावर महानगरपालिकेने दिलेले परवानगी, अग्निशमन विभागाकडील परवानगी पत्र प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.
17. मंडप / स्टेज वर कोणत्याही जातीय / धार्मिक भावना दुखावल्या जातील आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. असे आक्षेपार्ह बॅनर, देखावे किंवा फलक नसावेत.
18. परवानगी धारकांनी त्यांना निश्चित करून दिलेल्या आकारमानाचा मंडप उभारणे बंधनकारक राहील.
19. ध्वनी प्रदुषण विषयक कोणत्याही बाबींचा भंग होणार नाही. याची दक्षता घ्यावी व उत्सव कालावधीत ध्वनी प्रदुषणाच्या विहीत मर्यादा पातळीचे निकषाची अंमलबजावणी करावयाची आहे. तसेच या संदर्भात पोलीस विभागामार्फत ठरवून दिलेल्या वेळेचे बंधन पाळण्याची दक्षता घ्यावयाची आहे.
20. उत्सव संपल्यानंतर परवानगी अर्जामध्ये नमुद केलेल्या तारखेपर्यंत मंडप काढुन घ्यावा.
21. मा.उच्च न्यायालयाने महसूल विभागातील अधिकाऱ्यांना उत्सवाच्या 10 दिवस अगोदर मंडप तपासणी करण्यास आदेश दिलेले आहेत. त्यामुळे मंडपाचे काम सुरू असतांना मंडपाच्या ठिकाणी जबाबदार व्यक्ती माहिती देण्यासाठी ठेवण्यात यावा. सदर अधिकारी मंडप तपासणीसाठी येतील त्यावेळेस मंडळाच्या जबाबदार व्यक्तीने अधिकाऱ्यांस परवानगी दाखवावी व विचारलेली माहिती देण्यात यावी.

➢ **सार्वजनिक गणेशोत्सव मार्गदर्शक सुचना व अटी शर्ती**

1. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महापालिका / स्थानिक प्रशासन यांनी त्यांचे धोरणानुसार यथोचित पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.
2. जाहिरातीच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी.
3. सांस्कृतिक कार्यक्रमाऐवजी आरोग्य विषयक उपक्रम / शिबीरे उदा.रक्तदार शिबीर आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याव्दारे कोरोना, मलेरिया, डेंग्यु इत्यादी आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय, तसेच स्वच्छता या बाबत जनजागृती करण्यात यावी.

4. आरती, भजन, किर्तन व अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करताना गर्दी होणार नाही. तसेच ध्वनी प्रदुषणा संदर्भातील नियमांचे व तरतुदीचे पालन करण्यात यावे.
5. विसर्जनाच्या पारंपारिक पध्दतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करून विसर्जन स्थळी कमीत कमी थांबावे. लहान मुले आणि वरिष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाणे टाळावे.
6. महानगरपालिका विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने कृत्रीम तलावांची निर्मिती करण्यात यावी.

- **शास्ती**

1. महानगरपालिकेच्या परवानगी पुर्वी टाकण्यात येणारे मंडप / कमान हे विना परवानगी समजण्यात येतील. मंडप टाकणे हे विकास कामात अंतर्भुत होत असल्याने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 च्या कलम 54 अन्वये नोटीस देऊन हटविण्यासाठी कारवाई करण्यात येईल व संबंधीता विरूध्द सदर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल.
2. विनापरवानगी जाहिरात लावल्यास सदरची जाहिरात काढण्यात येईल व विना परवानगी जाहिरात लावल्या बद्दल महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपाणास प्रतिबंध अधिनियम 1995 चे कलम 3 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल.
3. मंडप / कमानी उभारतेवेळी विना परवानगी रस्त्याची खोदाई केल्यास परवानगी करीता आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या दुप्पट शुल्क आकारण्यात येईल.
4. महानगरपालिकेच्या विद्युत पोलवरून विद्युत जोडणी घेतल्यास अर्जदार / मंडळाचे पदाधिकारी यांचे विरूध्द विद्युत चोरीचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

# जाहिर आवाहन

**(परिशिष्ट 'क')**

या जाहिर आवाहनाव्दारे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सार्वजनिक मंडळाना / नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, सन 2026 मध्ये दि.14.09.2026 रोजीपासून गणेशोत्सवास सुरुवात होत आहे.

जी मंडळे / नागरिक तात्पुरत्या मंडप परवानगी करीता अर्ज करण्यास इच्छुक असतील अशा मंडळानी / नागरिकांनी अर्ज दाखल करण्यापूर्वी महानगरपालिकेच्या www.chhsambhajinagarmc.org या संकेत स्थळावर (Website) उपलब्ध असलेली मार्गदर्शक तत्वे - 2026 वाचावीत व त्यानुसार अर्ज दाखल करावा.

सदरचे अर्ज स्विकारण्याची सुरुवात दि.08.09.2026 पासून ते दि.25.09.2026 या कार्यालयीन वेळेत राहील. परवानगीसाठी करण्यात येणारे अर्ज परिपुर्ण असावेत. अर्जदारांना मंडप उभारण्याची परवानगी विहीत मुदतीत मिळावी व त्यांना नाहक त्रास होऊ नये, तसेच उत्सव साजरा करता वेळी परिसरातील नागरिकांना व वाहतुकीला अडथळा होऊ नये, याचा सखोल विचार करून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे मार्गदर्शक तत्वे - 2026 कार्यालयीन पध्दती तयार केलेली आहे.

मंडळांनी / नागरिकांनी परवानगीसाठी अर्ज दाखल केला म्हणजे त्यांना परवानगी प्राप्त झाली असे समजण्यात येऊ नये. परवानगी शिवाय मंडप उभारल्यास सदर मंडप हटविण्यात येईल व संबंधीता विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी.

सर्व मंडळ / नागरिक यांनी आवश्यक परवानगी घेऊन कायदा व सुव्यवस्थेची जपणुक करीत सुनियोजितरित्या उत्सवाच्या आयोजना करीता छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेस संपुर्ण सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

Digitally signed by
Amol Jagannath Yedage
Date: 30-08-2026
20:38:59

**अमोल येडगे** (भाप्रसे)
आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

Digitally signed by
NAWALE VIKAS RAMESH
Date: 27-08-2026
11:08:28

# अर्जाचा नमुना

(परिशिष्ठ "ख")

विविध उत्सवांकरीता मंडप परवानगी अर्जाचा नमुना

दिनांक :- / /2026.

1. अर्जदाराचे नांव :- ---------------------------------------------
2. संपर्क ध्वनी क्रमांक :- ---------------------------------------------
3. ई-मेल आयडी :- ---------------------------------------------
4. मंडळाचे नांव :- ---------------------------------------------
5. अर्जदाराचे पद (मंडळामधील) :- ---------------------------------------------
6. मंडळ नोंदणी क्रमांक :- ---------------------------------------------
7. मंडप उभारण्यात येणाऱ्या जागेचा पत्ता :- ---------------------------------------------
8. मंडपाचे क्षेत्रफळ :- ---------------------------------------------
9. जागेची मालकी :- ---------------------------------------------
10. मंडपाचा कालावधी :- ---------------------------------------------
11. मंडप बांधकाम सुरू करण्याचा दिनांक :- ---------------------------------------------
12. मंडप काढण्याचा अंतिम दिनांक :- ---------------------------------------------
13. कमान उभारण्याचे ठिकाण व संख्या :- ---------------------------------------------
14. कमानीची उंची :- ---------------------------------------------
15. विसर्जनाचा दिनांक व ठिकाण :- ---------------------------------------------
16. मिरवणुकीचा मार्ग :- ---------------------------------------------

मी -------------------------------------------------- याव्दारे असे जाहिर करतो / करते की, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मंडप / स्टेज उभारणे बाबतच्या मार्गदर्शक तत्वानुसार व जनहित याचिका क्र.173/2010 मधील मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार उत्सव साजरा करण्यात येईल. कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास या बाबतची सर्व जबाबदारी मंडळाची राहील.

अर्जदाराची सही, नांव व पत्ता

-----------------------------

-----------------------------

-----------------------------

**जोडपत्र :-**

1. अर्ज विहीत नमुन्यात सादर करावा.
2. जागा कालकाचे ना हरकत दाखला.
3. मंडप / स्टेज स्थळ दर्शक नकाशा.
4. स्थानिक पोलीस स्टेशनचा मागील वर्षाचा ना हरकत दाखला (असल्यास)
5. वाहतुक पोलीस स्टेशनचा मागील वर्षाचा ना हरकत दाखला (असल्यास)
6. अग्निशमन विभागाचा मागील वर्षाचा ना हरकत दाखला (असल्यास)
7. एम.एस.ई.डी.सी. विभागाचा मागील वर्षाचा ना हरकत दाखला (असल्यास)
8. मंडळाने पदाधिकारी, सदस्य यांच्या नावाची यादी व संपर्क क्रमांक.

# <u>परवानगी पत्राचा नमुना</u>

(परिशिष्ठ "ग" वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 234 अन्वये दयावयाची परवानगी)

जा.क्र./मनपा/वॉर्ड क्र. /2026/________
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दि. . .2026.

## <u>ना हरकत प्रमाणपत्र</u>

**प्रती,**
**श्री / श्रीमती** -----------------------------
अध्यक्ष / सचिव,
--------------------------------------
--------------------------------------

**विषय :-** ---------------------------- उत्सवासाठी तात्पुरत्या मंडप / कमान उभारणेस परवानगी बाबत.

**संदर्भ :-** 1.मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मामअ/2023/880, दि.16.09.2023.
2.आपला दिनांक ------------------- रोजीचा अर्ज.
3.वरिष्ठ पोलीस निरीक्षक -------------- यांचेकडील दि.------------- रोजीचा ना हरकत दाखला.
4.वाहतुक पोलीस निरीक्षक --------------- यांचेकडील दि.------------- रोजीचा ना हरकत दाखला.
5.अग्निशमन अधिकारी --------------- यांचेकडील दि.------------- रोजीचा ना हरकत दाखला.
6. एम.एस.ई.बी. --------------- यांचेकडील दि.------------- रोजीचा ना हरकत दाखला.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपला संदर्भीय अर्ज प्राप्त झाला आहे. संदर्भ क्र.2,3,4 व 5 नुसार संबंधीत प्राधिकरणांनी ना हरकत दाखले दिलेले आहेत. त्याअनुषंगाने आपणआपल्या मंडळातर्फे -----------------उत्सव साजरा करणे करीता, मंडप / स्टेजसाठी सन 2026-27 पर्यंत ------------------- या ठिकाणी उभारण्यास खालील अटी व शर्तीस अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**अटी शर्ती :-**

1. परवानगी मिळाल्यानंतर परवानगीचे पत्र मंडपाच्या दर्शनी भागावर किमान दोन ठिकाणी प्रदर्शित करावे.
2. गणेशोत्सव मंडपाच्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाकडून नियमानुसार विद्युत जोडणी घेण्यात यावी. विद्युत पुरवठा घेता वेळी वायरिंगमध्ये जोड खुला राहणार नाही, या करीता सर्व विद्युत कामे परवाना धारक ठेकेदारामार्फत योग्य प्रकारे करण्यात यावीत.

3. मंडपाच्या ठिकाणी आग प्रतिबंधक साधने, प्रथमोपचाराची साधने (First Aid Box) तात्काळ उपलब्ध होतील, अशा प्रकारे मंडपा लगत ठेवावीत.

4. कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रत्येकी 200 लीटर क्षमतेच्या पाण्याच्या 2 टाक्या भरून ठेवणे आवश्यक आहे.

5. मंडपातील आरास बंद स्वरूपाची असल्यास नागरिकांना अत्यावश्यक वेळी बाहेर जाण्यास सुटसुटीत मोकळा मार्ग ठेवण्यात यावा.

6. मंडप उभारते वेळी अग्निशमन दलाची वाहने अत्यावश्यक घटनेच्या वेळी मंडपाजवळ जाऊ शकतील अशा प्रकारे मोकळी जागा ठेवण्यात यावी.

7. मंडपातुन निघालेला सर्व कचरा ओला व सुका असा वर्गीकरण करून आणि निर्माल्य बंद डब्यात ठेऊन त्याची विल्हेवाट लावण्याची, तसेच गणेशोत्सव मंडप व आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मंडळाची राहील.

8. मंडपा पासून विद्युत तार व डी.पी. बॉक्स 06 फुट अंतरावर ठेवणे मंडळावर बंधनकारक आहे. तसेच विद्युत रोषणाई मंडपापासून जास्तीत जास्त 15 मीटर अंतरापर्यंत करता येईल.

9. मंडपाच्या प्रवेशव्दारावर महानगरपालिकेने दिलेली परवानगी, अग्निशमन विभागाकडील परवानगी पत्र प्रदर्शित करणे बंधनकारक आहे.

10. मंडपात कोणत्याही जातीय / धार्मिक भावना दुखावल्या जातील आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे आक्षेपार्ह बॅनर, देखावे किंवा फलक नसावे.

11. परवानगी धारकांनी त्यांना निश्चित करून दिलेल्या आकारमानाचा मंडप उभारणे बंधनकारक राहील.

12. ध्वनी प्रदुषण विषयक कोणत्याही बाबींचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी. उत्सवाच्या कालावधीत ध्वनी प्रदुषणाची विहीत मर्यादा पातळीचे निकषाची अंमलबजावणी करावयाची आहे. तसेच या संदर्भात पोलीस विभागामार्फत ठरवून दिलेल्या वेळेचे बंधन पाळण्याची दक्षता घेण्यात यावी.

13. उत्सव संपल्यानंतर परवानगी अर्जामध्ये नमुद केलेल्या तारखेपर्यंत मंडप काढुन घ्यावा.

14. मंडपाचे काम सुरू असतांना मंडपाच्या ठिकाणी जबाबदार व्यक्ती माहिती देण्यासाठी ठेवण्यात यावी. महसूल विभागातील अधिकारी मंडप तपासणीसाठी येतील, त्यावेळी मंडळाच्या जबाबदार व्यक्तीने सदर अधिका-यांस परवानगी दाखवावी व विचारलेली माहिती त्यांना दयावी.

15. स्थानिक वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतुक पोलीस निरीक्षक, अग्निशमन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, एम.एस.ई.बी. यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र सादर न केल्यास, तसेच उपरोक्त कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास, तसेच उपरोक्त अटी शर्तीमधील कोणत्याही बाबींचे उल्लंघन करण्यात आल्यास मंडळास देण्यात आलेली मंडप उभारणी परवानगी तात्काळ रद्द समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

16. सदरची स्टेज व मंडप याची परवानगी पुढील 03 वर्षाच्या कालावधी पर्यंत देय राहील तथा सदर परवानगी पुर्वी अनुज्ञेय करण्यात आलेल्या स्तरावर देय राहील.

**सहाय्यक आयुक्त**
वॉर्ड कार्यालय -
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

| अ. क्र. | वॉर्ड अधिकारी तथा सहाय्यक नोडल अधिकारी | टोल फ्री क्रमांक | ई-मेल आय.डी. |
|---|---|---|---|
| 1. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amc.warda@gmail.com |
| 2. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardg525@gmail.com |
| 3. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardc3789@gmail.com |
| 4. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amcwar0@gmail.com |
| 5. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardezone05b@gmail.com |
| 6. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardezone06b@gmail.com |
| 7. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amcwardaf@gmail.com |
| 8. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amcsatara8i@gmail.com |
| 9. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | amcward09@gmail.com |
| 10. | सहा.आयुक्त तथा सहा.नोडल अधिकारी | 18002336233 | wardoffice10csmc@gmail.com |